महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ अॅटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१


दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्‌अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ९८ वा | रविवार, दि.०९ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली मोहोळच्या बस स्थानकाच्या नव्या इमारतीसाठी साडेतीन कोटी रुपयांच्या निधीला तात्विक मान्यता

## शिवसेना नेते तथा प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या प्रयत्नांमुळेच.. मोहोळच्या बस स्थानकाच्या नव्या इमारतीचा प्रश्न लागला मार्गी



## परिवहन मंत्री सरनाईक यांचे प्रथम नगराध्यक्ष बारस्करांनी मानले आभार तर मोहोळ शहरवासीयांनी व्यक्त केली कृतज्ञता

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक वर्षापासून मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भक्कमपणे कार्यरत असलेले शिवसेनेचे ओबीसी विभागाचे राज्याचे नेते तथा मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या अविरत पाठपुराव्यामुळे मोहोळ येथील मध्यवर्ती बस स्थानकाच्या इमारतीच्या सुसज्ज निर्मितीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. याबाबत राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रतापजी सरनाईक यांनी मोहोळ येथील बस स्थानकासाठी बीओटी तत्त्वावर तब्बल साडे तीन कोटी रुपयांच्या निधीला तत्वतः मान्यता दिली असल्याची माहिती प्रथम नगराध्यक्ष तथा शिवसेना नेते रमेश बारसकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

बीओटी तत्त्वावर बसस्थानकाचे अद्यावतीकरणासाठी प्राप्त झालेल्या या निधीमधून मधून सुसज्ज बस स्थानकाबरोबर अद्यावत व्यापारी गाळ्यांचीही म्हणजे शॉपिंग इमारतीचीही निर्मिती होणार आहे. मोहोळ येथून तालुक्याच्या चारही दिशेला जाणाऱ्या महामार्गावरील प्रवाशांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल मोहोळ शहरवासीयातून कृतज्ञता व्यक्त केली जात आहे.

११ ऑक्टोबर रोजी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री नामदार प्रताप सरनाईक आले असता त्यांनी आवर्जून प्रथम नगराध्यक्ष तथा शिवसेनेचे नेते रमेश बारसकर यांच्या क्रांती भवन या संपर्क कार्यालयाला आवर्जून भेट देत मोहोळ तालुक्यातील विकासात्मक कामांचा आढावा घेतला. यावेळी रमेश बारसकर यांनी अभ्यासूपणे मोहोळ येथील बस स्थानकाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत त्यांना अवगत केले. यावर परिवहन मंत्र्यांनी तात्काळ गेल्या अनेक वषार्पासून रखडलेल्या नूतन बसस्थानक इमारत निर्मितीचा प्रश्न बी. ओ. टी. तत्त्वावर साडेतीन कोटी रुपयांच्या निधीला तात्विक मान्यता देत सोडविला आहे. मोहोळ बरोबर सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातीलही काही बस स्थानकांच्या नवनिर्मितीचा प्रश्न या तत्त्वतः मान्यता देण्याच्या आदेशामुळे सुटणार आहे.

“ मोहोळ हे माझ्या मोहोळ शहर आणि तालुक्यातील प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टीने अत्यंत मध्यवर्ती आणि मोक्याचे बस स्थानक आहे दोन्ही महामार्गाची निर्मिती झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या आणि अत्यंत जीर्ण अवस्थेत असलेल्या बस स्थानकामधून या ठिकाणचा बस सेवेचा कारभार चालत होता.

मोहोळच्या एसटी स्टँडवरून सांगोला, कोल्हापूर, रत्नागिरी, इस्लामपूर, सातारा, आटपाडी, पुणे, मुंबई या भागात शेकडो बसेस ये जा करतात. मात्र प्रवाशांना या ठिकाणी अद्यावत बस स्थानक उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत होता. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, शिवसेना नेते तथा मंत्री नेते ना.भरतजी गोगावले यांना प्रत्यक्ष भेटून या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर परिवहन मंत्री आमच्या कार्यालयात सदिच्छा भेटी प्रसंगी आले असता त्यांच्या लक्षात ही बस स्थानकाची बाब आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ मोहोळ बस स्थानकासाठी बिओटी तत्त्वावर साडेतीन कोटी रुपयांच्या निधीला तत्वतः मान्यता देण्याचा आदेश केला. त्याबद्दल मोहोळ शहरवासीयांच्या वतीने मी आभार व्यक्त करतो. आता मोहोळ तालुक्यातील प्रत्येक गावाला, वाडी वस्तीला एसटी बसच्या फेऱ्या सुरू होण्यासाठी परिवहन मंत्र्याकडे पाठपुरावा करणार आहे.

**- रमेश बारसकर,** प्रथम नगराध्यक्ष मोहोळ

# प्रभाग ९ मधून उत्तरेश्वर (सुदाम) शिंगाडे निवडणूक लढवण्यावर ठाम

## सात दिवसात त्यांच्या कार्यकर्त्यांनी पिंजून काढला अख्खा प्रभाग

## पक्षाकडून उमेदवारी नाही मिळाली तर अपक्षचा पर्याय शिंगाडेंना खुला

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या दक्षिण हद्दवाढ भागातील सर्वसामान्य लोकांचा प्रभाग असलेल्या प्रभाग क्रमांक नऊ मधून यापूर्वीपासूनच मोर्चे बांधणीला सुरुवात करत निवडणूक लढवण्याचा इरादा स्पष्ट करणारे उत्तरेश्वर तथा सुदाम शिंगाडे हे त्यांना अपेक्षित पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्यास त्यांच्यासमोर अन्य पक्षांच्या पयार्याबरोबर अपक्ष म्हणून देखील निवडणूक लढवण्याचा पर्याय खुला असल्याची माहिती त्यांच्या समर्थकांनी माध्यमांशी बोलताना दिली.



गेल्या सहा वर्षापासून प्रत्येक सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणाऱ्या या युवा नेत्याने प्रभागातील सर्वांचेच लक्ष स्वतःकडे केंद्रित केले आहे. दररोज उपलब्ध होणारा, प्रशासनाला न्याय हक्कासाठी भांडणारा, रस्ते पाणी आरोग्य विषयक समस्यासाठी आंदोलने करणारा एक धडपडी चेहरा म्हणून सुदाम शिंगाडे यांच्याकडे पाहिले जाते.त्यांनी नेता न होता आयुष्यभर कार्यकर्ताच रहावे यासाठी प्रभागातून अनेक वेळा रणनीती आखली गेली. मात्र तरीही न डगमगता स्वाभिमानी विचाराने त्यांचे सहकारी दिलीप पवार आणि सुदाम शिंगाडे यांनी प्रभागातील स्थानिक उमेदवारीचा मुद्दा पुढे करत निवडणुकीतील रान तापवले आहे.

### पक्ष ठरला नसूनही प्रतिसाद कायम

सर्वसामान्य कुटुंबातून आलेला गरिबीची जाण असलेला, समाजसेवेचे भान असलेला आणि त्यामुळेच सर्वसामान्यांमध्ये मान असलेला हा उमदा कार्यकर्ता निवडणूक लढवणार असल्यामुळे प्रभागातील मतदारांना देखील आता एका चांगल्या नगरसेवकाला निवडून आणण्याची संधी उपलब्ध होणार आहे. ऐकावे जनाचे करावे मनाचे याप्रमाणे न वागता ऐकावे सर्वांचे आणि राबावे सर्वांसाठी या आधुनिक म्हणीने राजकीय क्षेत्रात चमकत असलेला हा उगवता तारा आता या प्रभागातील राजकारणामध्ये 100% निवडून येणारा नगरसेवक म्हणून ओळख मिळवत आहे हे मात्र नक्की.

# प्रभाग दहा मधून भाजप उमेदवारीसाठी सारिका सागर लेंगरे यांनी दिली मुलाखत..

## ज्येष्ठ पक्षश्रेष्ठी आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांनी दिली आत्मविश्वासाची शाबासकी..

## गेल्या अनेक दशकापासूनच्या पक्षनिष्ठेला उमेदवारीच्या स्वरूपात मिळणार पोचपावती

**मोहोळ (साहिल शेख):-** गेल्या दोन दशकापासून भारतीय जनता पक्षाचा अभेद्यबाले किल्ला असलेल्या प्रभाग क्रमांक दहा मधून ओबीसी महिला प्रवगार्तून सारिका सागर लेंगरे यांनी काल उमेदवारीसाठीच्या पक्षाने घेतलेल्या मुलाखत प्रक्रियेत सहभागी होऊन अत्यंत उत्साही आणि उत्स्फूर्तपणे मुलाखत देऊन या प्रभागातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याचे आत्मविश्वासपूर्वक स्पष्ट केले.

सारिका लेंगरे या भारतीय जनता युवा मोचार्चे यापूर्वी प्रसिद्धीप्रमुख म्हणून काम पाहिलेले सोशियल मीडिया सेलचे अभ्यासू युवा नेते तथा युवा उद्योजक सागरदादा लेंगरे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. सागर लेंगरे हे वयाच्या चौदाव्या वषार्पासून भारतीय जनता पक्षात सक्रियपणे पक्षाची जबाबदारी खांद्यावर घेऊन अत्यंत कमी वयात राजकारणात सातत्याने चर्चेत असलेले कार्यकर्ते आहेत.राज्याच्या कानाकोपऱ्यातील भाजपच्या वरिष्ठ स्तरावरील पदाधिकाऱ्यांची नाळ जुळलेले जिल्ह्यातील एक नावाजलेले युवा कार्यकर्ते आहेत. त्यांच्या उमेदवारीबाबत भारतीय जनता पक्षाचे जिल्हास्तरावरील अनेक पक्षश्रेष्ठी सकारात्मक असून लेंगरे यांनी आजवर दाखवलेल्या निष्ठेची पोचपावती शंभर टक्के त्यांना त्यांच्या पत्नी सारिका लेंगरे यांच्या उमेदवारीच्या स्वरूपात मिळणार असल्याचे त्यांच्या समर्थकांचे मत आहे.

प्रभाग क्रमांक दहा मधील रस्ते, पाणी, आरोग्यविषयक सुविधा सोडविण्यासाठी नगरसेवक सुशील भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वषार्पासून सागर लेंगरे हे प्रयत्नशील असतात. सारिका लेंगरे यांचा ही महिला विषयक उपक्रमामध्ये सातत्याने सहभाग असतो याशिवाय सागर दादा लेंगरे आणि त्यांचे बंधू युवा उद्योजक समाधान दादा लेंगरे यांचा मोठा स्नेह परिवार प्रभाग क्रमांक जुन्या १७ मध्ये आहेत. मात्र विविध कामाच्या माध्यमातून त्यांचा मोहोळ शहरातील प्रभाग सोहळा मध्ये देखील चांगलाच प्रभाव आहे प्रत्येकाशी आपुलकीने वागणारी आणि मनमिळावू स्वभावाची लेंगरे परिवारातील व्यक्तींच्या लोकप्रियतेचा मोठा फायदा या निवडणुकीत त्यांना होणार आहे.



### कोण आहेत सारिका लेंगरे..

सारिका सागर लेंगरे या गेल्या तीन दशकांपूर्वी मोहोळ शहराच्या पूर्व भागातील सुळे नगर येथे व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेल्या ज्येष्ठ मार्गदर्शक अनंत ज्ञानदेव लेंगरे यांच्या स्नुषा आहेत. अनंत लेंगरे हे अत्यंत कष्टाळू आणि प्रामाणिक ध्येयधोरणाने कार्यरत असलेले मार्गदर्शक होते. दूध व्यवसायाच्या निमित्ताने आणि हॉटेल व्यवसायाच्या निमित्ताने घरापर्यंत आलेल्या प्रत्येकाला आपुलकीने चार शब्द बोलून त्याला चार घास भरवणारे एक कणवाळू व्यक्तिमत्व म्हणून ते या प्रभागात सुपरिचित होते. त्यांचे सुपुत्र सागर लेंगरे यांनी अत्यंत कष्टातून बंधू समाधान लेंगरे यांच्या सहकायार्तून विविध व्यवसायात यश मिळवून लावलौकिक मिळवला. आज या परिवाराचे उद्योग क्षेत्रातील यशाबरोबर राजकीय क्षेत्रातीलही दमदार पदार्पण निश्चितपणे यशदायी ठरेल असे अनेकांना वाटत आहे.

# बरे परिवाराच्या ज्येष्ठ मार्गदर्शिका भारतीमाई बरे प्रभाग सात मधून निवडणूक लढवणार

## प्रभागातील विनंतीला मान देऊन माईंनी काल भाजपाकडे मुलाखतीद्वारे केली उमेदवारीची मागणी

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ शहराचा मध्यवर्ती प्रभाग म्हणून ओळख असलेल्या प्रभाग क्रमांक सात मधून मोहोळ शहरातील उद्योग आणि व्यापार क्षेत्रात विशेष नावलौकिक प्राप्त केलेल्या बरे परिवारातील जेष्ठ मार्गदर्शिका भारती (माई) भारत बरे यांनी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारीची मागणी केली आहे. कालच त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे आपल्या उमेदवारीसाठीची मुलाखत देऊन या प्रभागातून रीतसर उमेदवारीची मागणी पक्षाकडे केली आहे.

यापूर्वीचा जुना प्रभाग क्रमांक दहा आणि प्रभाग क्रमांक दोनचा संयुक्त प्रभाग म्हणून प्रभाग सात ची निर्मिती झाली आहे या प्रभागातून सर्वसाधारण महिला आणि सर्वसाधारण असे खुले आरक्षण सोडत आहे. त्यामुळे सर्वसाधारण महिला प्रवगार्तून भारतीय माई बरे या निवडणूक भारतीय जनता पक्षाकडून लढवण्याचे निश्चित झाले आहे.

### मुलाखतीप्रसंगी पक्षश्रेष्ठी राजन पाटील यांनी दिला बरे परिवाराच्या चार दशकापासूनच्या अजोड निष्ठेला उजाळा..



भारतीमाई बरे या मोहोळ शहरात नावाजलेल्या सावित्रीबाई फुले सहकारी पतसंस्थेच्या पंधरा वर्षे सलग महिला संचालिका म्हणून कार्यरत राहिल्या आहेत. राजकीय क्षेत्रात बरे यांनी गेल्या अनेक वर्षांपूर्वी पदार्पण केले आहे. कोणत्याही पदाच्या अपेक्षेशिवाय निष्ठेने कार्यरत राहणाऱ्यापैकी बरे परिवार एक आहे. त्यावेळी अत्यंत आव्हानात्मक काळात प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत परिणामांची तमा न बाळगता राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली भारत बरे यांनी त्यावेळी ग्रामपंचायतची निवडणूक लढवत केवळ ३७ मतांनी पराभव पत्करला. त्यामुळे त्यांचा जनमानसातील असलेला जनाधार त्यावेळी सर्वांच्या लक्षात आला तो आजतागायतही टिकून आहे.

धार्मिक उत्सवाबरोबर वृक्षारोपण रक्तदान शिबिर त्याचबरोबर महिलाविषयक विविध प्रबोधनात्मक उपक्रम राबवण्यावर त्यांनी दिलेला भर त्यांच्या सामाजिक कायार्तील योगदानाची चुणूक दाखवतो. त्यामुळे प्रभागातील अनेक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून आपण प्रभाग सात मधून निवडणूक लढवावी अशी विनंतीवजा आग्रह केला. त्यानंतर भाजपचे जेष्ठ मार्गदर्शक राजन पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

भारती (माई) बरे या मोहोळ शहरातील गेल्या अनेक दशकापासून किरणा आणि अन्य उद्योग क्षेत्रात नावाजलेल्या बरे परिवारातील वैचारिक आधारस्तंभ आहेत. भारत बरे, शरद बरे, नेहरू बरे हे तिघेही बंधू गेल्या अनेक दशकापासून अनगरकर -पाटील परिवाराशी एकनिष्ठ असलेले राजकीय सहकारी म्हणून सर्वपरिचित होते. स्व. भारत बरे यांच्या निधनानंतर खंबीरपणे बरे परिवाराची धुरा हातात घेतलेल्या भारती (माई) बरे यांनी सामाजिक क्षेत्रात आपल्या कायार्चा अलौकिक ठसा उमटवला आहे.

# प्रभाग दहा मधून धनुष्यबाण चिन्हावर चैतन्य पद्माकर (अप्पा) देशमुख निवडणूक लढविणार

## प्रभाग दहा मधील सामाजिक पोकळी भरून काढण्यासाठी देशमुख यांच्या उमेदवारीची जुळणी

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने निवडणूक जाहीर झाल्याच्या पहिल्या दिवसापासूनच आक्रमक मोर्चेबांधणी सुरू केली आहे. आता प्रभाग दहा मधून देखील यापूर्वीच्या सत्ताधारी आणि विरोधकांना शिवसेना शिंदे गटाकडून सरळ सरळ खुले आव्हान देण्यात येणार असल्याचे आता जवळपास निश्चित झाले आहे. या प्रभागातून शिवसेनेचे युवा नेते तथा मोहोळ शहरातील युवा उद्योजक चैतन्य पद्माकर (अप्पा) देशमुख हे निवडणुकीच्या रिंगणात धनुष्यबाण चिन्ह घेऊन उतरणार आहेत.

आमदार राजू खरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा प्रवक्ते उमेशदादा पाटील, शिवसेनेचे ओबीसी विभागाचे राज्याचे नेते रमेश बारसकर, त्याचबरोबर स्वतः पद्माकर आप्पा देशमुख हे या प्रभागाच्या विजयी रणनीतीची कमान सांभाळणार आहेत.

यापूर्वीच्या या प्रभाग सोळा आणि १७ चा मिळून संयुक्त नवा दहा क्रमांक प्रभाग निर्मित झाला आहे. सामाजिक



समीकरणाचा मेळ घालण्यासाठी प्रस्थापित पक्ष यापूर्वीच्या प्रभाग क्रमांक सतरा मध्येच सर्व उमेदवारीचा घाट घालत आहेत. त्यामुळे मोहोळ शहराचा अत्यंत मोक्याचा असलेला कुरुल रोड भागाच्या पूर्वेकडील मोठा आणि अत्यंत विस्तारलेल्या भागातून उमेदवारी देण्यात अन्य पक्ष कमी पडत असल्यामुळे या प्रभागातून स्थानिक रहिवाशी असलेले चैतन्य देशमुख हे निवडणूक लढवण्याचे निश्चित झाले आहे. गतवेळी शिवसेनेचे युवा नेते विक्रम पंडितराव देशमुख हे केवळ निसटत्या नऊ मतांनी पराभूत झाले होते. विशेष म्हणजे या प्रभागात देशमुख यांचा स्नेह परिवार मोठा आहे. तसेच देशमुख गायकवाड परिवाराचे पै -पाहुणे देखील या प्रभागात मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. याशिवाय श्री नागनाथ देवस्थानच्या प्रत्येक धार्मिक कार्यात पद्माकर अप्पा देशमुख आणि देशमुख परिवाराचा सातत्याने पुढाकार असतो. त्यामुळे प्रत्येक सामाजिक कार्यात झोकून देणारे पद्माकर अप्पा देशमुख हे या प्रभागातील सर्वांशी आदरभाव जपणारे व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. या शिवाय विविध सामाजिक उपक्रमांमध्ये देखील त्यांचे सुपुत्र चैतन्य देशमुख यांचा सहभाग राहिल्यामुळे त्यांना या प्रभागातून चांगले मतदान मिळू शकते. त्यामुळे प्रभाग दहा मधून खुल्या प्रवर्गातून चैतन्य देशमुख यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागातील वातावरण निवडून निघणार आहे.

### खुला प्रवर्ग असूनही विशिष्ट समाजाची मते मिळवण्यासाठी अन्य खुल्या प्रवर्गावर होतोय अन्याय..

या प्रभागातील सामाजिक घटकांचा अभ्यास केला असता या प्रभागात मराठा आणि मुस्लिम मतदार वर्गही मोठा आहे. त्यामुळे या दोन समाजासह अन्य अल्पसंख्याक समाजाला खुला प्रवर्ग असूनही अप्रत्यक्षरीत्या डावलले गेल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गातून चैतन्य देशमुख यांची उमेदवारी निश्चित होऊन ते निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास मराठा समाज आणि देशमुख परिवाराला आणि शिवसेनेला मानणारा अल्पसंख्याक समाज देखील त्यांच्यासोबत जाऊ शकतो. त्यामुळे एका विशिष्ट समाजाच्या विचारधारेवर उमेदवारीची खिरापत वाटणाऱ्या प्रस्थापित पक्षांना या प्रभागात मोठी किंमत मोजावी लागणार आहे हे मात्र नक्की.

## संपादकीय

# बिनचेहऱ्याचे लुटारू

लुटमारीचे प्रकार कायमच चालत आले आहेत. सर्वसामान्यांना थेट फटका देणारे गुन्हे म्हणून पाकिटमारी किंवा गळ्यातली चेन लांबवणे हे प्रकार सुपरिचित आहेत. यात तुम्ही तुमच्यासोबत जी काही रोकड अथवा सोने बाळगत आहात त्यालाच धोका असतो. बँकांमधील अथवा घरातील रक्कम आणि अन्य ऐवज सुरक्षित असतो. नंतर घरातला ऐवजही सुरक्षित नसल्याचे सिद्ध झाले असले तरी बँकांमधील ऐवज मात्र सुरक्षित होता आणि आहे असे आजही मानले जाते. प्रगती जशी होत गेली तसे व्यवहारांचेही स्वरूप बदलत गेले. मोबाइलच्या एका क्लिकवर घरात बसून कोणत्याही वेळेत आर्थिक व्यवहार करता येतात. जसे व्यवहारांचे स्वरूप बदलले तसे गुन्ह्यांचेही स्वरूप बदलले. त्यामुळे बँकेतील ऐवजही सुरक्षित नसल्याचे आता स्पष्ट झाले.

गुन्हेगारीच्या या वाढत्या जाळ्यात 'डिजिटल अरेस्ट' नावाचा एक नवीन प्रकार सगळ्यांत मोठे आव्हान म्हणून समोर आला आहे. प्रत्येक समस्येचा मुकाबला करण्यासाठी काही उपाय केलेले असतात. डिजिटल अरेस्टच्या बाबतीत उपलब्ध असलेले सर्व उपाय खुजे किंवा कुचकामी ठरत असल्याचे दिसते. सायबर गुन्हेगार लूट करण्यासाठी रोज नवनवीन प्रकार अवलंबत आहेत. सुरुवातीला दुर्मिळात दुर्मिळ म्हणता येऊ शकणारा डिजिटल अरेस्टचा नामक गुन्हा पाहता पाहता आता अजगरासारखे सगळेच गिळंकृत करायला निघाला आहे. यातील सगळ्यांत धोकादायक बाब म्हणजे याच्या माध्यमातून जी लूट केली जाते त्यात तुम्हाला स्वतःला गुन्हेगाराला तुमची कमाई सोपवावी लागत असून बहुतांश प्रकरणात लुटणाऱ्याचा चेहराही तुम्हाला दिसत नाही.

व्हॉटस्अप, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून तुम्हाला धमकावले जाते. तुमच्या कथित काळ्या कृत्याची भीती घातली जाते आणि धमकावले जाते. गुन्हेगार स्वतःला पोलीस असल्याचे भासवतो आणि लोक त्याला बळी पडतात. यात कोणते संमोहन नसते, असते ती केवळ भीती. डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे तीन हजार कोटी रुपये गुन्हेगारांनी लुटले असल्याचे सीबीआयने म्हटले आहे. त्यामुळे खुद्द सर्वोच्च न्यायालयालाच याची दखल घ्यावी लागली. हरियाणातील एका ज्येष्ठ महिलेने अलीकडेच सरन्यायाधीशांना एक पत्र लिहिले होते. या महिलेला आणि तिच्या पतीला डिजिटल अटक करून गुन्हेगारांनी एक कोटींपेक्षा जास्त रक्कम हडपल्याची कैफियत या महिलेने मांडली. जेव्हा थेट मदतीची याचना करणारे पत्र येते तेव्हा न्यायालयांना अथवा न्यायाधीशांना मूक प्रेक्षक बनून राहता येत नाही.

सायबर गुन्हेगारांना आवरा, त्यांना वेसण घालण्यासाठी पावले उचला असे न्यायालयाने कठोर शब्दांत तपास संस्थांना सांगितले. राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो अर्थात एनसीआरबीनेही त्यांच्या अहवालात सायबर गुन्ह्यांशी संबंधित हादरवणारी आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार 2022 या वर्षात सायबर गुन्ह्यांची 65,983 प्रकरणे नोंदवली गेली होती. मात्र हेच प्रमाण 2023 मध्ये 86,420 पर्यंत वाढले. ही वाढ 31 टक्के एवढी होती. नियमितपणे सायबर गुन्ह्यांची प्रकरणे समोर येत असून लोकांची लुटमार सुरू आहे. या गुन्ह्यांमधील गुन्हेगारांची कार्यशैली ठरलेली असते तरीही त्यांना नियंत्रित करण्यात मोठी आव्हाने आहेत. तंत्रज्ञान हेच त्यांचे सगळ्यांत मोठे शस्त्र असल्यामुळे ते कोणत्याही भागातून अथवा भूमीतून आपल्या गुन्हेगारी कृत्याला चालना देऊ शकतात.

अशा वेळी हद्द, सीमा, अधिकारक्षेत्र आदी बाबी अडथळे ठरतात. बहुतेकदा वेगवेगळ्या कायदेशीर चौकटी आणि नियमही अडथळे निर्माण करण्याचे काम करतात. चेहरा नसल्यामुळे गुन्हेगारांना शोधणे अवघड होते. तद्वतच कळत नकळत पीडिताकडूनही त्यांना मदत करण्याचेच काम केले जाते. बदनामीच्या भीतीने अथवा निव्वळ अज्ञानामुळे ज्यांना या गुन्ह्याची झळ पोहोचली आहे अशी मंडळी तक्रारी करण्यास पुढेच येत नाही. कायदा अथवा तपास संस्था आपल्याला यात मदत करू शकतात असा विश्वास या पीडितांना असेल किंवा नसेलही; मात्र बदनामीची भीती किंवा टवाळीचा विषय ठरण्याची भीती त्यांच्यावर अधिक घट्ट कब्जा करून असते. स्मार्टफोन अथवा अन्य माध्यमे वापरर्णायांची संख्या आज भलेही 80-90 कोटींच्या घरात असेल, पण प्रत्येकालाच प्रत्येक गोष्टीचे ज्ञान असत नाही. मोबाइलवरचे बोट चुकीच्या ठिकाणी जरी घसरले गेले तरी नको ते समोर येत वापरकर्ता त्यात ओढला जातो.

गुन्हेगारांची या प्रगत तंत्रज्ञानावर असलेली पकड आणि अत्यंत प्रगत साधनांची असलेली उपलब्धता हेच त्यांचे बलस्थान आहे. त्यामुळे या स्वरूपाच्या गुन्ह्यांचा अन गुन्हेगारांचा छडा लावण्यासाठी तपास संस्थांनी त्यांच्या दोन पावले पुढे असणे अपेक्षित आहे. 3 हजार कोटी लुटीची जी आतापर्यंतची ढोबळ आकडेवारी समोर आली आहे त्यापेक्षा कदाचित रक्कम कैकपटीने जास्तही असू शकते. त्याचे कारण गुन्हेगारांनी जे सावज हेरले असतात त्या प्रत्येकाला त्यांनी वेगवेगळ्या धमक्या देत वेगवेगळ्या सापळ्यात अडकवले असते. त्यात नागरिकांनी अडकू नये आणि स्वतःचा अभिमन्यू करून घेऊ नये याकरता त्यांनीच माहिती आत्मसात करणे आवश्यक आहे आणि याबाबत जागृती निर्माण करणे व प्रशिक्षण देणे अत्यावश्यक ठरले आहे. या घोटाळ्यांचा जागतिक स्तरावर सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य वाढवणे अपेक्षित आहेच, मात्र त्याच वेळी स्थानिक स्तरावरही पीडितांना सहजपणे तक्रार करता यावी यासाठी अधिक पर्याय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. गोपनीयतेचा पैलू विशेष ध्यानात घेतला गेला तर लोक वेळीच तक्रार दाखल करू शकतील. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 सारखे कायदे या गुन्ह्यांचा मुकाबला करण्यासाठी पाया प्रदान करतात. तथापि, त्यात अधिक सुधारणा आणि बहुआयामी दृष्टिकोनाची गरज आहे. तसे केले तरच डिजिटल अटक घोटाळ्यांच्या वाढत्या धोक्यांपासून व्यक्तींचे संरक्षण करता येऊ शकेल.

# शेतकरी खरंच मोठ्या मनाचे असतात हो!


शेतकरी जगाचा पोशिंदा असतो. शेतकरी जगला तरच शेती पिकणार आहे आणि हा देश टिकणार आहे. ज्या दिवशी शेतकरी शेतात अन्नधान्य पिकवायचे बंद करतील त्या दिवशी अख्या जगाला उपाशी मरावे लागेल. उभ्या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आता निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. शेतकऱ्यांच्या नशिबी कायम दुष्काळ येत आहे. जास्त पाऊस पडला तर ओला दुष्काळ पडतो आणि कमी पाऊस पडला तर कोरडा दुष्काळ पडतो. म्हणजे शेतकरी नेहमी दुहेरी नैसर्गिक संकटात अडकलेला असतो. जेव्हा शेतकरी नैसर्गिक व आस्मानी संकटात अडकतो तेव्हा शेतकऱ्यांच्या मदतीला कोणीच धावून येत नाही. मायबाप सरकार देखील शेतकऱ्यांचा वाली बनून येत नाही. निवडणुकीच्या काळात राजकारणी मात्र शेतकऱ्यांच्या हिताच्या मोठमोठ्या बाता मारतात आणि एकदा निवडून आल्यावर पाच वर्षे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतात. घर प्रपंच चालवणे, मुला बाळांच्या शिक्षणाला पैसा लावणे, मुलींचे लग्न करणे आणि सुखदुखाला पैसा लावणे या महत्त्वाच्या समस्या सोडवण्यासाठी शेतकऱ्यांना पैशाची नितांत गरज भासते. अशा अनेक आर्थिक समस्या शेतकऱ्यांपुढे आवासून उभ्या ठाकलेल्या असतात. जेव्हा शेतीला पूरक पाऊस पडतो आणि शेत शिवार हिरवळीने नटतो तेव्हा शेतकरी देखील आनंदात न्हाऊन निघतो. मग शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावत नाही. शेतकरी शेतात भाजीपाला व तरकारी लावतात. आणि बाजारात जाऊन विकतात. तेव्हा शेतकऱ्यांचा शेतमाल व भाजीपाला योग्य भावात कोणीच घेत नाही. शेतकऱ्यांना कधीच योग्य हमीभाव मिळत नाही. ग्राहक दुसरीकडे कुठेही गेले तर घासाघीस करून सामान घेत नाहीत. दुकानदार सांगेल तेवढ्या किंमतीत माल खरेदी करतात. शेतकऱ्यांचे मन देखील खूप मोठे असते. शेतकऱ्या एवढा मोठ्या मनाचा व्यापारी या जगात कोठेच शोधूनही सापडणार नाही. शेतकरी आपला माल देताना ग्राहकाला नेहमी झुकते माप देतो. हा शेतकऱ्यांचा मनाचा मोठेपणा व हाताचा सढळपणा आपल्याला कळतो. शेतकरी आपल्याला माल व भाजीपाला देताना कोणताच विचार न करता सढळ हाताने व मोठ्या मनाने झुकते माप देतो पण आपण शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव का देत नाहीत? शेतकऱ्यांच्या मुलाबाळांचा का विचार करत नाहीत? सरकार शेतकऱ्यांसाठी एवढे निष्ठूर का होत आहे. शेतकऱ्यांप्रती सरकारला काही दयामाया आहे का नाही? सरकार शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार का करत नाही? नावालाच तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांची फसवणूक व दिशाभूल करत आहे. जाणीवपूर्वक शेतकऱ्यांच्या कोपराला गुळ लावत आहे.

शेतकऱ्या एवढे मोठे मन दुसऱ्या कोणाचेच नसते. अहोरात्र शेतात कष्ट करून व घाम गाळून पिकवलेले पीक शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने विकावे लागत आहे. शासन शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव कधी देणार आहे? सरकार शेतकऱ्यांना बोलाचाच भात आणि बोलाचीच कडी चारत आहे. नुसते पोकळ आश्वासन देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे. आणि इलेक्शन मध्ये मते घेऊन निवडून येत आहे. ज्याप्रमाणे शेतकरी आपल्यासाठी मोठ्या मनाने आणि सढळ हाताने झुकते माप देते त्याप्रमाणेच आपण देखील शेतकऱ्यांना काहीतरी भरीव योगदान देऊन व त्यांना मानसिक आधार देऊन त्यांचे अश्रू पुसावेत. ज्या दिवशी आपण शेतकऱ्या एवढे मोठे मन करून शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत कराल त्या दिवशी आपल्या देशात आनंदाची मंगलमय पहाट उगवेल आणि देश जगाची महासत्ता होण्याच्या उंबरठ्यावर असेल... आणि तुम्ही जर शेतकऱ्यांसोबत चालढकलपणा करू लागलात तर सर्व शेतकरी एक होऊन तुम्हाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत हे त्रिकाला बाधित सत्य कोणालाही नाकारता येणार नाही... त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांप्रती गंभीर राहून त्यांच्या हिताचे ठोस निर्णय घ्यावेत आणि शेतकऱ्यांना आणखीन मजबूत करावे हीच सरकारला माझी कळकळीची नम्र विनंती...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

# '१५ लाख कोटी पडून आहेत' तर फडणवीस म्हणतात पैसे नाहीत- गडकरी

**नवी दिल्ली (वृत्तसेवा):-** देशाच्या अर्थव्यवस्थेला झटके बसत असताना, पूरग्रस्त शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत, कंत्राटदारांचे थकलेले बिलांमुळे आत्महत्येचे टोक गाठत आहेत, शिवभोजन थाळी चालकांची बिले रखडलेली आहेत, आणि 'लाडकी बहीण' योजनेत लाभार्थी कमी करण्याचे आदेश दिले जात आहेत. अशा पार्श्वभूमीवर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केलेलं एक वक्तव्य राजकीय वतुर्ळात खळबळ उडवतंय.



गडकरी म्हणाले 'माझ्याकडे १५ लाख कोटी रुपये पडून आहेत.'
आता प्रश्न असा आहे की, मग हे पैसे पडून आहेत तरी कशासाठी? देशातील रस्त्यांची स्थिती अतिशय दयनीय आहे, महामार्ग अपूर्ण, पूल कोसळतायत, गावोगावी खड्डेच खड्डे आहेत. शहरातील रस्त्यांचीही दुरावस्था आहे. अशा परिस्थितीत कोट्यवधींचे फंड पडून राहणे म्हणजे केवळ लोकांच्या भावनांशी खेळणं नाही का?
राज्य सरकार शेतकऱ्यांना सांगतं, 'खजिना रिकामा आहे.'
कंत्राटदार म्हणतात, 'बिलं मिळत नाहीत.'
शिवभोजन चालक दररोज प्रशासनाच्या दारात धडपडतायत.
'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली महिलांना आश्वासने दिली, पण आता नव्या अटी घालून लाभार्थीच कमी केले जातायत.
अशा वेळी केंद्रीय मंत्री मोठ्या अभिमानाने म्हणतात, '१५ लाख कोटी रुपये पडून आहेत!'
हा निधी देशाच्या विकासासाठी आहे की केवळ आकड्यांची जादू दाखवण्यासाठी?
शेतकऱ्यांना मदत नाही, रस्ते खड्डेमय, योजनांना निधी नाही, पण केंद्रात कोट्यवधींचे 'पडून असलेले' पैसे आहेत! असे गडकरींनी सांगितल्या नंतर सार्वजनिक रोष उफाळून येतोय.
त्यामुळे जनताच विचारतेय —
'गडकरी साहेब, हा पैसा कधी वापरणार?
जनतेचा विकास कधी होणार?
आणि जो निधी पडून आहे, तो कुणासाठी राखून ठेवला आहे?'
खरंच, अशा वक्तव्यांनी सरकारची संवेदनशीलता आणि वास्तवातील तफावत पुन्हा एकदा उघड झाली आहे.
१५ लाख कोटींचं गणित जनतेला नको तिला न्याय, मदत आणि प्रामाणिक प्रशासन हवं आहे!

# नगरपरिषदेवर भाजपाचा झेंडा फडकवा - माजी आमदार सातपुते

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यात भारतीय जनता पक्षाची ताकद अधिक वाढवण्यासाठी माजी आमदार राजन पाटील यांच्या पक्षप्रवेशाला मोठे महत्त्व असून, त्यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील दोन्ही नगरपरिषदांवर भाजपाचा झेंडा फडकेल, असा विश्वास माजी आमदार राम सातपुते यांनी व्यक्त केला.



मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या तिकिटावरून नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी इच्छुकांच्या मुलाखतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी राम सातपुते म्हणाले की, 'राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ तालुक्यात पक्ष अधिक बळकट होणार आहे. ज्यांना त्यांचे नेतृत्व मान्य आहे, त्यांनी एकत्र येऊन काम करावे. पक्षाची एकजूट राखून विजयाचे ध्येय समोर ठेवावे.'

या मुलाखतींच्या कार्यक्रमाला माजी आमदार राजन पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, उपजिल्हाप्रमुख प्रकाश चवरे, माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके, मंडल अध्यक्ष सतीश काळे व रमेश माने, सोमेश क्षिरसागर, विकास वाघमारे, सुशील क्षीरसागर, सुरेश राऊत, संजय पडवळकर, नागेश बिराजदार, वैभव गुंड, संतोष वायचळ, दाजी गाढवे, महेश सोवनी आणि अविनाश पांढरे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या निवड प्रक्रियेत नगरसेवक पदासाठी तब्बल ७२ इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या, तर नगराध्यक्ष पदासाठी ९ महिलांनी आपली इच्छा व्यक्त केली असल्याची माहिती भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश चवरे यांनी दिली. मोहोळ नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजप आता पूर्ण ताकदीने तयारीला लागली असून, पक्षाच्या संघटनात्मक बळावर आणि स्थानिक नेतृत्वाच्या एकजुटीवर पक्षाला विजय मिळवून देण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

## प्रबोधन

# बुद्धीचा वापर अधिक करा, प्रश्न सोडवा

Impossible is the word in the dictionary of the fools- असं प्रसिद्ध सेनानी, विख्यात भूमितीतज्ज्ञ, प्रख्यात कायदेपंडित आणि विलक्षण बुद्धिमान असा फ्रान्सचा सम्राट नेपोलियन म्हणत असे. शालेय जीवनात दुपारच्या मधल्या सुटीत त्याला काहीही खायला मिळत नव्हतं. इतकी त्याच्या घरची परिस्थिती हलाखीची होती. पण कमालीचा प्रयत्न करून हा कंगाल मुलगा एके दिवशी जगाला धाक घालणारा सम्राट झाला. आपल्या बुद्धीचा पुरेपूर उपयोग करून घेऊन त्याने हे यश मिळवलं. प्रचंड रणधुमाळी चालू असतानासुद्धा विरंगुळा म्हणून भूमितीची प्रमेये युद्धभूमीवरच सोडवणारा आणि आपल्या हजारो सैनिकांपैकी प्रत्येकाला नावाने हाक घालणारा नेपोलियन हा फ्रान्सचा ज्ञानेश्वरच होता.

तरीही नेपोलियननेसुद्धा आपल्या मेंदूचा काही १०० टक्के वापर केला नसेलच. मानसशास्त्रज्ञाच्या मते, सर्वच माणसं जास्तीत जास्त १० टक्के मेंदूचाच वापर करतात. परिणामी, आपणा सर्वांचा ९० टक्के मेंदू वापराविना तसाच राहातो. त्यामुळेच मनुष्याचा संचार जगभर असला तरी सुव्यवस्था, सुबत्ता सर्वत्र आढळत नाही. डोके असूनही ते न वापरल्याच्या बिनडोकपणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यात बरेचजण दुसऱ्याच्या डोक्यानेच जगतात आणि त्यांच्या स्वार्थी-फसवणुकीचे भक्ष्य होतात. यालाच शहाणे लोक शोषण म्हणतात. डोकेबाज माणूस कुठेही असो, तो शोषणमुक्त जीवनच जगतो. एकप्रकारे तो नेपोलियनचा अनुयायी असतो. म्हणून परिस्थितीवर कशी मात करावी हे त्याला कळतं. मात्र जगभराची सामान्य वर्गीय माणसं रूढी, रूढ विचार, प्रचलित परंपरा, प्राप्त परिस्थितीत 'अधिक डोके न चालविता' आयुष्य कंठतात. देव, धर्म, कर्मकांड, सणवार, उत्सव, आदिंच्या माध्यमातून माजणाऱ्या अंधश्रद्धा, फसव्या रूढी, नाना भेद जोपासणाऱ्या परंपरा ते बिनडोकपणे स्वीकारतात. यांच्या जोडीने असामान्य वर्गातील बरेच लोकसुद्धा बिनडोकपणेच जगतात. गंगेला भिकारीही नमस्कार करतो आणि धनाढ्यही नमस्कार करतो. डॉक्टरेट केलेले विद्वानही शेवटी गंगाकाठी मरण यावं म्हणून पछाडलेले दिसतात. त्यात काही अर्थ नसतो, मोक्ष वगैरे गप्पा सफेत झूट आहेत, हेही त्यांना कळत नसतं. अशा लोकांना परिवर्तनवादी नवे विचार अशक्य वाटतात.

खरं तर, ह्यात अशक्य काही नसतं. उदाहरणार्थ, सणातील भिक्षुकांना माजवणारे धार्मिक अवडंबर बंद करता येतं. तसं केल्याने काही भूकंप होत नाही आणि केले म्हणून काही तो टळत नाही. तसा आपल्या जगण्याचा देव- धमार्शी काहीही संबंध नसतो. तसाच आपल्या सांपत्तिक स्थितीचा संबंध कुणी दुकान उघडताना पाया पडतो, कुणी आद्याला कोणा भोंदूबाबाच्या आशीर्वादाचा नारळ किंवा कोहळा बांधून ठेवतो, किंवा कारखाना-कार्यालयातील देवादिक परमपूज्यांच्या फोटोला नमस्कार करण्याशी काहीही संबंध नसतो. पण डोकं न वापरणाऱ्यांना या अवडंबरातून सुटणं अशक्य वाटतं. जुना विचार सोडणंही त्यांना शक्य नसतं आणि नवा विचार घेणंही त्यांना शक्य नसतं.

अशी माणसं निर्बुद्धच नव्हे, तर मानसिकदृष्ट्या अधिक दुबळी असतात हेच खरं. असत्याला मानणं, विश्वचालकपदी कोणाची तरी नेमणूक करणं, भविष्यकाळाला अदृष्ट म्हणणं, कुंडल्या मांडून होम-हवन-शांतींचं थोतांड मांडणं, आत्मा अमर मानणं, भक्तीने ईश्वराला प्रसन्न करण्याचा अट्टहास करणं, त्यासाठी जीवहत्या करणं, व्रत-वैकल्यात स्वतः गुंतणं आणि दुसऱ्यांनाही गुंतवून ठेवणं ही सर्व दुबळ्या मनोवृत्तीची स्पष्ट लक्षणं आहेत.

अशाच प्रकारे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक उपक्रमसुद्धा असतात. धर्मांध अतिरेकी संघटना, विषमताजन्य घटनाविरोधी हिंसक चळवळी, श्रीमंतांच्या धनवृद्धीला घटनेचं संरक्षण करणं, मागासवर्ग आणि मागास क्षेत्राला विकासकार्यात सहभागी न करणं, शिक्षण क्षेत्राच्या बाजारूपणाकडे डोळेझाक करणं, लोकसंख्यावाढीकडे दुर्लक्ष करणं, सार्वजनिक जीवनातून देव-धर्मवादाची हकालपट्टी न करणं, राजकीय नेतृत्वाचा रोजच उदो उदो करणं, हे सारे लोकनेतृत्वाच्या मानसिक दुबळेपणाचे पुरावे आहेत. हे दुबळेपण संपवण्यासाठी नेपोलियनचं वचन लक्षात घेऊन त्यानुसार वागण्याचा चंग बांधला पाहिजे. त्यासाठी फक्त निश्चयाचे बळ पाहिजे. मग सारे भारतीय म्हणतील-

अशक्य ते शक्य । प्रयत्नाने होते
अशक्य नसते । जगी काही ॥१
निश्चय पाहिजे । कार्य करण्याचा
हातात यशाचा। पडे लाभ ॥ २
कोणतेही कार्य । बुद्धीने साधावे
युक्तीने झटावे । यश येण्या ॥ ३
ध्यास लागल्यास। कौशल्य वाढते
कौशल्याने येते। यशस्विता ॥४
मनाचे आवेग । ध्यानी घेऊ नये
निराशेला द्यावे । पिटाळूनी ॥५
प्रवृत्ती आपली। कर्ममय करा
उत्साहाचा झरा वाहण्यास ॥६
प्रसन्न चित्ताने । झटा रात्रंदिन
यश मिळवून। थोडे थांबा ॥७
कार्यमग्न व्यक्ती । जगी सर्वश्रेष्ठ
जीवन बलिष्ठ । भोगतसे ॥८
कर्महीन व्यक्ती। किडामुंगीपरी
पराभूतापरी । जगतस॥१०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# शिक्षक व पदवीधर निवडणुकांसाठी मतदार नोंदणी सुरु

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागातील पदवीधर मतदार संघ, तसेच पुणे व अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघांच्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, 6 नोव्हेंबर, 2025 पर्यंत पात्र पदवीधर आणि शिक्षकांकडून अनुक्रमे प्रपत्र 18 व 19 मध्ये प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेतील. त्यानुसार 25 नोव्हेंबर, 2025 रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील. यानंतर 25 नोव्हेंबर ते 10 डिसेंबर 2025 या कालावधीत नागरिकांना या यादीविषयी दावे व हरकती सादर करण्याची संधी मिळेल. तसेच 6 नोव्हेंबर नंतरही पदवीधर आणि शिक्षकांना प्रपत्र 18 व 19 द्वारे मतदार नोंदणी करण्याची मुभा असेल.

10 डिसेंबर, 2025 पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांवर विचार करून 30 डिसेंबर, 2025 रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

शिक्षक आणि पदवीधर मतदार संघांसाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा देखील उपलब्ध आहे. इच्छुकांनी https://mahaelection.gov.in/Citizen/Login या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार नोंदणीसाठी आवश्यक पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे व संबंधित माहिती या संकेतस्थळावरील "Manual" या विभागात पाहता येईल. त्यामुळे अद्याप अर्ज सादर न केलेल्या पात्र पदवीधर व शिक्षकांनी तात्काळ आपली नोंदणी करून घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## कविता

# शेतकरी जगला पाहिजे

शेतकरी उभ्या जगाचा पोशिंदा
त्याच्या नशिबी दुष्काळाचा फंदा
कधी अतिवृष्टी तर कधी उन्हाळासोसाव्या
लागतात दुष्काळाच्या झळा
शेतकरी जगला तर हे जग टिकेल शेती
विना हे जग उपाशी झोपेल शेतकरी,
शेतमजूर जगला पाहिजे
शेतकऱ्यांचा मान वाढला पाहिजे
सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करते
सावकार त्यांना कर्जाच्या खाईत लोटते
शेतकरी सुखात राहिला पाहिजे सांगून गेले
छत्रपती शिवाजी राजे
शेतकऱ्यांना आता वालीच उरला नाही
शेतकऱ्याविना पूर्ण जग उपाशी राही शेतकरी
माझा शेतात राब राब राबतो
दुष्काळ मात्र त्यांना नाराज करून टाकतो
शेतकऱ्यांवर येत आहेत वाईट दिवस
म्हणून पडताहेत शेत शिवार सारे वस
शेतकऱ्यांना शेती करण्यात राहिला नाही रस
देत आहेत शेतकरी सारे नशिबाला दोष
शेतकरी आत्महत्या रोज वाढत आहेत
आत्महत्या करून शेतकरी मोकळे होत आहेत
शेतकऱ्यांची कोणी दखल घेत नाही
शेतकरी आत्महत्या काही टळत नाही
शेतकऱ्यांवर करू नका अन्याय अत्याचार
शेतकरी असतात तलवारीची तळपती धार
एक दिवस करून टाकतील तुम्हाला बेजार
म्हणून शेतकऱ्यांचा
करा हो थोडा तरी विचार

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

# प्रमुख प्रचारकांची संख्या आता २० ऐवजी ४०

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या (र३ं१ उेंस्रँल्ली१) संख्येची मर्यादा आता राज्य निवडणूक आयोगाने २० वरून ४० केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असलेली प्रमुख प्रचारकांची मर्यादा वाढवून ४० करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाच्या कार्यालयात १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत केली होती. 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' मधील परिच्छेद २६ मध्ये प्रमुख प्रचारकांसंदभार्तील तपशील नमूद केला आहे. त्यातील तरतुदींच्या आधारे आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेऊन ही संख्या वाढविण्यात आली आहे. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

## वात्रटिका

# संपवण्याची सुपारी

परवा परवाची गोष्ट हो
कळले परवा दुपारी...
कोणाला मारण्याची
कोणी तरी दिली सुपारी...
इकडून निशाणा धरून
तिकडे फैरी लागल्या झडू...
झोंबू लागले संत सज्जनाला
तो म्हणे मी कशाला धंद्यात पडू...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शिक्षक व पदवीधर निवडणुकांसाठी मतदार नोंदणी सुरु

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागातील पदवीधर मतदार संघ, तसेच पुणे व अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघांच्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, 6 नोव्हेंबर, 2025 पर्यंत पात्र पदवीधर आणि शिक्षकांकडून अनुक्रमे प्रपत्र 18 व 19 मध्ये प्राप्त झालेल्या अर्जावर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेतील. त्यानुसार 25 नोव्हेंबर, 2025 रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील.

यानंतर 25 नोव्हेंबर ते 10 डिसेंबर 2025 या कालावधीत नागरिकांना या यादीविषयी दावे व हरकती सादर करण्याची संधी मिळेल. तसेच 6 नोव्हेंबर नंतरही पदवीधर आणि शिक्षकांना प्रपत्र 18 व 19 द्वारे मतदार नोंदणी करण्याची मुभा असेल.

10 डिसेंबर, 2025 पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जावर विचार करून 30 डिसेंबर, 2025 रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

शिक्षक आणि पदवीधर मतदार संघांसाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा देखील उपलब्ध आहे. इच्छुकांनी https://mahaelection.gov.in/Citizen/Login या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदार नोंदणीसाठी आवश्यक पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे व संबंधित माहिती या संकेतस्थळावरील 'Manual' या विभागात पाहता येईल. त्यामुळे अद्याप अर्ज सादर न केलेल्या पात्र पदवीधर व शिक्षकांनी तात्काळ आपली नोंदणी करून घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# भाजपच्या सर्व जागा जिंकण्यासाठी तरुणांनी निवडणूक हातात घ्यावी- रणजीतसिंह शिंदे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा मतदारसंघात येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे (भाजप) कमळ चिन्ह असलेल्या सर्व जागांवर विजय मिळावा, यासाठी तरुणांनी निवडणुकीचे नेतृत्व हातात घ्यावे, असे आवाहन जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांनी केले.



शिराळ (ता. माढा) येथील ज्येष्ठ नेते अरुण काका लोकरे यांनी दोनशे कार्यकर्त्यांसह भव्य फोर व्हीलर रॅलीच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. यावेळी, शिराळ टें परिसरातील कार्यकर्त्यांनी मागील काळातील पक्षाच्या नेतृत्वाबाबत विश्वास व्यक्त करत आगामी निवडणुकीतही जास्तीत जास्त मतांसह भाजपचे उमेदवार निवडून आणण्याचा निर्धार केला.

रणजीतसिंह शिंदे म्हणाले, ह्माझे मार्गदर्शक बबनदादा शिंदे निवडणुकीदरम्यान नसल्यामुळे तुम्हा सर्वांनी पक्षाचा पाया अधिक मजबूत करावा. विकासकामे मार्गी लावल्यानंतर उर्वरित कामांची जबाबदारी आपण सर्वांनी घेतली पाहिजे. कोणतीही गरज किंवा समस्या असो झ्र तुमच्या सेवेची आम्ही सदैव तयारी ठेवू. भाजपच्या विश्वासावर पुढे चला.ह्व

तालुकाध्यक्ष योगेश (बाबाराजे) बोबडे यांनी प्रवेशकर्त्यांचे भाजपा कुटुंबात स्वागत करत,"विधानसभा निवडणुकीप्रमाणेच कार्यकर्त्यांनी कसलाही भ्रम न ठेवता, बोल बुलयाच्या ताफ्यांना बळी न पडता भाजप पक्षाच्या उमेदवारांना घवघवीत मतांनी निवडून द्यावे," असे यावेळी आव्हान केले

यावेळी जेष्ठ नेते अरुण काका लोकरे म्हणाले की काही उत्साही नेत्यांमध्ये चर्चा होती की, "नेते गेले, कार्यकर्ते राहिले या चर्चा फोल आहेत. आम्ही मोठ्या रॅलीद्वारे भय्यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपमध्ये एकत्र आलो, हे सर्वांना दाखवले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपा उमेदवारांना कुर्डू जिल्हा परिषद गटात व पंचायत गणात विजय मिळवून देण्यासाठी आम्ही खंबीरपणे उभे राहू.

या प्रवेश सोहळ्यात माजी कृषी सभापती संजय पाटील (भिमानगर), युवा नेते गोटू पाटील (अकोले खुर्द) चांदचे टकले चेअरमन, बाळासाहेब ढगे, तसेच समाधान यादव, महादेव लोकरे, प्रदीप लोकरे, राजेंद्र लोकरे, बंडू मुळे, अक्षय लोकरे, अमोल नवले, सुरेश तळेकर, शिवाजी सोलंकर, महादेव घाडगे, दीपक पाटील, आदी सहभागी झाले होते.

शिराळ व परिसरातून फोर व्हीलर रॅली काढून टेंभुर्णी शहरातून निमगाव टें पर्यंत रॅली आल्याने अनेक कार्यकर्त्यातून उत्साही वातावरणात झालेल्या या प्रवेशाने भाजपा शिंदे गटाची ताकद पुढील जिल्हा परिषद निवडणुकीची दिशा ठरणार असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

# युटोपियन शुगर्स येथे रस्ते सुरक्षा अभियान संपन्न

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** कचरेवाडी ता.मंगळवेढा येथील युटोपियन शुगर्स लि. येथे शनिवार दि.08/11/2025 रोजी रस्ते सुरक्षा अभियान संपन्न झाले. त्यावेळी बोलताना कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक म्हणाले की महाराष्ट्रातील सर्वच साखर कारखान्यांचा गळीत हंगाम नुकताच सुरु झाला आहे. "रस्ते सुरक्षा अभियान" हे रस्ते अपघात कमी करण्यासाठी आणि वाहतुकीच्या नियमांविषयी जागरूकता पसरवण्यासाठी दरवर्षी राबवले जाणारे एक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय अभियान आहे. या अभियानांतर्गत वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि कारखाना प्रशासन एकत्र काम करतात. याचा मुख्य उद्देश वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करुन रस्ते अपघात रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे हा आहे.



रस्ते अपघाताविषयी माहिती देताना मंगळवेढ्याचे पोलीस उपनिरिक्षक विजय पिसे यांनी अपघात टाळणेसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने ऊस वाहतुकीचे वाहनावर पाठीमागे, नमुन्यातील चार बाय चार फुटाचे रिफ्लेक्टर बोर्ड लावावेत. वाहन चालविताना मोठ्या आवाजात टेपरेकॉर्डर लावु नये, ओव्हरलोड वाहतुक करु नये, ऊसाने भरलेली वाहने पुढे नेण्यासाठी स्पर्धा करु नये. रस्तावर वाहन नादुरुस्त झाल्यास पुढे व पाठीमागे रिफ्लेक्टीव्ह कोन लावुन घ्यावेत. वाहन दुरुस्त झाल्यावर लावलेले दगड उटी रस्त्यावरुन बाजुला काढावीत. आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवु नये. चालकाकडे योग्य ते लायसन्स असणे गरजेचे आहे. भरलेल्या किंवा रिकाम्या वाहनाला दोनपेक्षा जास्त टेलर जोडु नये. शहरातील मुख्य रस्त्याचा वापर न करता बाह्यवळण रस्ताचा वापर करावा. रात्रीचे वेळी पाठीमागील बाजुस लाल रंगाचा टेल लँप दिवा लावावा. टेलरला दोन्ही बाजुस लाल, पिवळा व पांढऱ्या रंगाचे रिफ्लेक्टर टेप लावावेत जेणेकरुन वाहन वळण घेत असताना पुढील किंवा मागील वाहनास सुचना मिळेल. अशा मार्गदर्शक सुचना दिल्या.

टेपरेकॉर्डर लावुन वाहन चालवणे, कोणत्याही प्रकारची नशा करुन वाहन चालविणे असे आढळल्यास गुन्हा दाखल केला जाईल अशा सुचनाही त्यांनी या वेळी दिल्या. तसेच रस्ते वाहतुकीचे नियमही सर्व उपस्थित वाहन चालकांना समजावुन सांगितले. सदर प्रसंगी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे, पोलीस उपनिरिक्षक विजय पिस, पोलीस हेड कॉन्स्टेबल संभाजी यादव, पोलीस कॉन्स्टेबल युवराज साळुंखे, तोडणी-वाहतुक ठेकेदार यांचे हस्ते ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावणेत आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे व आभार ई.डी.पी मॅनेजर अभिजीत यादव यांनी मानले.

# अतिवृष्टी, महापूर नुकसानीचे १५७९ कोटी मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसान झालेल्या पिकांची नुकसानभरपाई म्हणून जिल्ह्याला आतापर्यंत १५७९ कोटी ३७ लाख रुपये मंजूर आहेत.

आता केवळ खरडून गेलेल्या जमिनीचा व ऑगस्ट महिन्यातील दोन हेक्टरवरील क्षेत्राची रक्कम मंजूर आदेश निघालेला नाही.

दरम्यान, आतापर्यंत ४०९ कोटी २० लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले असल्याचे सांगण्यात आले.



ऑगस्ट महिन्यापासून जिल्ह्यात पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान होत आहे. सप्टेंबर महिन्यात तर जिल्ह्यात उच्चांकी पाऊस पडला. कोणतेही मंडल अथवा मंडळातील गाव नुकसानीपासून वाचू शकले नाही.

पावसाळा संपल्यानंतर पीक नुकसानीची दाहकता समोर आली आहे. सप्टेंबर महिन्यात बीड, धाराशिव व अहिल्यानगर जिल्ह्यात पडलेल्या अति पावसाने जिल्ह्यातील सीना व इतर नद्यांना आलेल्या पुराची झळ संपूर्ण पिकांना बसली.

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या पीक नुकसानीची जिल्ह्याला चार आदेशान्वये रक्कम मंजूर झाली आहे. ती एकूण रक्कम १५७९ कोटी ३७ लाख रुपये इतकी आहे.

**केवळ खरडून गेलेल्या जमिनीची रक्कम बाकी**

सप्टेंबर महिन्यात पूर व अतिवृष्टीने झालेल्या पीक नुकसानीसाठी सात लाख ६४ हजार शेतकऱ्यांना ८६७ कोटी ३८ लाख रुपये मंजूर आहेत. त्यापैकी तीन लाख ४१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ४०९ कोटी २० लाख रुपये जमा झाले आहेत.

मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने जिल्ह्यातील ३२ हजार ४४० शेतकऱ्यांच्या २१ हजार ९८९ हेक्टर पिकांचे ४० कोटी ४३ लाख ४६ हजार रुपये मंजूर झाले व ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली आहे.

ऑगस्ट महिन्यात तीन हजार ९३० शेतकऱ्यांच्या चार हजार ७४८ शेतकऱ्यांच्या चार कोटी रुपये मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यामध्ये उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांचा समावेश आहे.

माती, गाळ साचून जमीन खराब झाल्याने तसेच जमीन खरडून गेल्याने नुकसान झालेल्या १७ हजार शेतकऱ्यांच्या बारा हजार हेक्टरचे ५४ कोटी ७५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. अक्कलकोट व माळशिरस तालुक्याची आकडेवारी आली नसल्याने रक्कम मंजूर झालेली नाही.

# प्रमुख प्रचारकांची संख्या आता २० ऐवजी ४०

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या (र३१ उेंर्ग्रॅल्ली१) संख्येची मयार्दा आता राज्य निवडणूक आयोगाने २० वरून ४० केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असलेली प्रमुख प्रचारकांची मयार्दा वाढवून ४० करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाच्या कार्यालयात १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत केली होती. 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' मधील परिच्छेद २६ मध्ये प्रमुख प्रचारकांसंदर्भातील तपशील नमूद केला आहे. त्यातील तरतुदींच्या आधारे आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेऊन ही संख्या वाढविण्यात आली आहे. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

# ज्वेलर्स दुकानावर दरोडा टाकणारी टोळी जेरबंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात आर.टी.ओ. रोडवरील समर्थ ज्वेलर्स दुकानावर दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहा जणांच्या टोळीला गुन्हे शाखेने अल्पावधीतच जेरबंद केले आहे. या टोळीकडून कोयता, पिस्तूल, मोटारसायकली आणि मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यांच्या अटकेमुळे शहरातील गुन्हेगारी टोळ्यांवर पोलिसांनी धसका बसवला आहे.

दिनांक १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास आर.टी.ओ. ऑफिस रोडवरील गणेशनगर बसस्टॉपजवळ समर्थ ज्वेलर्स दुकानात दोन इसमांनी कोयता आणि पिस्तुलाचा धाक दाखवत सोन्याचे दागिने लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र दुकानमालक



दीपक वेदपाठक आणि कर्मचाऱ्यांनी आरडाओरडा केल्याने चोरटे निळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून पसार झाले.

या घटनेचा तपास गुन्हे शाखेने तातडीने हाती घेतला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सात तपास पथके तयार करून सुमारे १२५ सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. दरम्यान, गोपनीय माहितीच्या आधारे यतीमखाना परिसरात सापळा रचून तीन संशयितांना अटक करण्यात आली.

अटकेतील आरोपींची नावे साहिल दशरथ गायकवाड (२०), समर्थ समीर गायकवाड, आणि सार्थक दशरथ गायकवाड अशी आहेत. चौकशीतून या गुन्ह्यात अजिंक्य चव्हाण (रा. वारजे माळवाडी, पुणे), विशाल जाधव (रा. तुळजापूर) आणि एक अल्पवयीन मुलगा सामील असल्याचे उघड झाले.

या टोळीने दरोड्यापूर्वी गाडीची ओळख पटू नये म्हणून पांढऱ्या ॲक्टिव्हा गाडीला निळा रंग मारून वापरल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी लोखंडी कोयता, निळी प्लॅटिना मोटारसायकल, मोबाईल फोन आणि काळ्या रंगाची ॲक्टिव्हा जप्त केली आहे.

तसेच समर्थ गायकवाड आणि अजिंक्य चव्हाण यांनी यापूर्वी होटगी रोडवरील चौधरी पेट्रोल पंपावर पिस्तुलाचा धाक दाखवत ₹३९,००० लुटल्याची कबुली दिली असून त्या गुन्ह्याचाही उलगडा करण्यात आला आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपआयुक्त डॉ. अश्विनी पाटील (गुन्हे/विशा), सहायक पोलीस आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, स.पो.नि. शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, विजय पाटील, मुकेश गायकवाड, निलेश पाटील-सोनवणे, तुकाराम घाडगे, दत्तात्रय काळे आणि सायबर शाखेच्या पथकाने केली.

# मलेरिया प्रतिबंधासाठी सोलापूर महानगरपालिकेचा विशेष उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य विभागामार्फत मलेरियापासून बचाव व प्रतिबंधात्मक उपाययोजना शहरभर राबविण्यात येत आहेत.

महानगरपालिकेच्या सर्व १ ते ८ विभागीय कार्यालयांच्या हद्दीत एकूण ६० क्षेत्र कार्यकर्ते दररोज दोन सत्रांमध्ये काम करत आहेत. हे कर्मचारी शहरातील पाणी साचलेले खड्डे, गटारी, डबके, तसेच इतर डास उत्पन्न होणाऱ्या ठिकाणी नियमितपणे डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करत आहेत. या मोहिमेचा उद्देश डासांची उत्पत्ती कमी करणे व मलेरियाचा प्रादुर्भाव रोखणे हा आहे.

तसेच नागरी आरोग्य केंद्राच्या आशा सेविका व आरोग्य सेवकांच्या माध्यमातून घराघरांत सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत असून नागरिकांना डास प्रतिबंधासाठी जागरूक केले जात आहे. घरातील पाण्याची टाकी, फुलदाणी, कुलर, पाण्याच्या साठवणीच्या भांड्यांमध्ये पाणी साचू न देण्याचे आणि नियमित स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

ऑक्टोबर महिन्यापर्यंत आरोग्य विभागामार्फत ८,८१६ घरांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून या माध्यमातून नागरिकांमध्ये मलेरियाविषयी जनजागृती करण्यात आली आहे.मलेरिया हा



प्लास्मोडियम नावाच्या परजीवीमुळे होणारा आजार आहे, जो मादी ॲनोफिलीस डासाच्या चावण्यामुळे पसरतो. या आजाराची प्रमुख लक्षणे म्हणजे – वारंवार येणारा तीव्र ताप, थंडी वाजणे, घाम येणे, तसेच डोकेदुखी, अंगदुखी, थकवा, मळमळ किंवा उलट्या होणे इत्यादी.

अशी कोणतीही लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या शासकीय रुग्णालयात किंवा सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी सौ. राखी माने यांनी केले आहे. वेळेत निदान व योग्य उपचार घेतल्यास मलेरियासारख्या गंभीर आजाराचा धोका टाळता येतो, असे त्यांनी सांगितले.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या परिसरात पाणी साचू देऊ नये, स्वच्छता राखावी, आणि डास प्रतिबंधासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ■ |
| ८ | | ■ | | ■ | ९ | १० | | | ■ | ११ | १२ |
| १३ | | १४ | ■ | १५ | | | | ■ | १६ | | |
| | ■ | १७ | | | ■ | ■ | ■ | १८ | | | ■ |
| १९ | २० | | ■ | २१ | २२ | २३ | ■ | ■ | २४ | | ■ |
| २५ | | ■ | २६ | | | | ■ | २७ | | ■ | २८ |
| ■ | २९ | ३० | | ■ | ■ | ३१ | ३२ | | | ■ | |
| ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | ३५ | | ■ | ३६ | |
| ३७ | | | ■ | ■ | | ■ | ३८ | | ■ | ३९ | |
| | ■ | ■ | ४० | ४१ | | ४२ | ■ | ■ | ४३ | | ■ |
| ४४ | ४५ | ■ | ४६ | | ■ | ४७ | ४८ | | | ■ | ४९ |
| ५० | | | | ■ | ■ | ५१ | | ■ | ५२ | | |

**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरूंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्टू (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरूवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे-**दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गच्या विरूध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु - 98

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

